| | |
|---|---|
| | दाखल दिनांक : – १८/१०/२०२२<br>नोंदणी दिनांक : – १८/१०/२०२२<br>निकाल दिनांक :– ०२/०१/२०२४<br>कालावधी:–**०१ वर्षे, ०२ महिने, १५ दिवस** |

**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी कोर्ट क्रमांक ३ अहमदपूर, यांचे न्यायालयात.**

**( पिठासीन अधिकारी – श्याम एस. तोंडचिरे )**

**(न्यायनिर्णय अधिघोषित दिनांक– ०२.०१.२०२४)**

नियमित फौजदारी खटला क्रमांक – ४४५/२०२२ निशाणी क्रमांक – १५

**CNR No. MHLA060028952022**

गुन्हा नोंद क्र. २३४/२०२२, पो. स्टे. किनगाव.

| | | |
|---|---|---|
| **अभियोग पक्ष.** | | **महाराष्ट्र शासन,**<br>तर्फे पोलीस उप–निरीक्षक,<br>पोलीस स्टेशन, किनगाव,<br>ता. अहमदपूर, जिल्हा लातूर. |
| **अभियोग पक्षा तर्फे.** | | सहाय्यक शासकिय अभियोक्ता श्री.के. बी. मस्के, |
| **आरोपी.** | | **हरीशचंद्र शिवाजी लव्हाळे,**<br>वय– ३५ वर्षे, कामधंदा– शेती,<br>रा. सताळा,<br>ता. अहमदपूर, जि. लातूर, |
| **आरोपी तर्फे विधीज्ञ.** | | अधिवक्ता श्री.बी.व्ही. कुमदळे |

**भाग– ब**

**(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद क्र. ४४(ii)अन्वये)**

| | | |
|---|---|---|
| वर्दी दाखल दिनांक | | ०८.१०.२०२२ |
| दोषारोप पत्र पाठविल्याचा दिनांक | | १७.१०.२०२२ |
| दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक | | ०२.१२.२०२२ |

| | | |
|---|---|---|
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | | ०२.१२.२०२२ |
| न्यायनिर्णयासाठी राखूण ठेवल्याचा दि. | | ०२.०१.२०२४ |
| न्यायनिर्णय दिनांक | | ०२.०१.२०२४ |
| न्यायनिर्णयातील शिक्षे संदर्भात आदेशाचा दिनांक | | निरंक, आरोपीची निर्दोष मुक्त करण्यात येते. |

**आरोपीचा तपशील**

| आरोपीं क्र. | आरोपींचे नावे | अटक दिनांक | जामिना वर सोडल्याचा दि. | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ. प्र. सं. क. ४२८ अन्वये समायोजीत (Set off) करणे बाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | **हरीशचंद्र शिवाजी लव्हाळे,** | ०८-१०-२०२२ | ०८-१०-२०२२ | महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५(अ) (ई) | निर्दोष मुक्त | निरंक | निरंक |

**भाग- क**

**(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद क्र. ४४(iii)अन्वये)**

| सा.क्र. | साक्षीदारांची नाव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| ०१ | संतोष हणमंत आदटराव, | जप्ती पंच | ११ |
| ०२ | गोविंद दशरथ मुंढे, | जप्ती पंच | १३ |

**अभियोग पक्षातर्फे दाखल करण्यात आलेले दस्त**

| द.क्र. | निशाणी | दस्त वर्णन |
|---|---|---|
| ०१ | पंचनामा सही | १२ व १४ |

**न्यायालया मार्फत निशाणी देण्यात आलेले दस्त**

| द.क्र. | निशाणी | दस्त वर्णन |
|---|---|---|
| ०१ | दोषारोप पत्र | ०१ |
| ०२ | फेरीस्त | ०२ |
| ०३ | मुद्देमाल पावती | ०३ |

**बचाव पक्षाचा पुरावा**

| द.क्र. | निशाणी | दस्त वर्णन |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**अभिलेखावरील मुद्देमाल**

| म.क्र. | मुद्देमाल क्र. | दस्त वर्णन |
|---|---|---|
| ०१ | निरंक | देशी दारु भिंगरी संतरा कंपनीच्या १८० मिलीच्या १२ बाटल्या. |

## न्या य नि र्ण य

( दिनांक ०२ जानेवारी, २०२४ रोजी अधिघोषित )

प्रस्तुत प्रकरणी आरोपीं विरुध्द महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम-१९४९, कलम–६५ (अ) व (ई) अन्वये शिक्षा पात्र गुन्हयासाठी अभियोग चालिवण्यात आला.

**अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे** –

**०२.** वर्दीदार पोलीस कॉ, श्री. रामचंद्र गोखरे यांनी दिनांक ०८/१०/२०२२ रोजी वर्दी दाखल केली की, त्यादिवशी ते मा. सहायक पोलीस निरीक्षक, किनगाव यांच्या अवैध धंद्याची माहिती काढून केस करणेबाबत तोंडी आदेश दिल्याने, ते सोबत पोका/१८५५ कोळी, असे सताळा येथे हजर असता, १८.३० वाजताचे सुमारास, त्यांना गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, सताळा येथे राहते घरी, एक इसम नामे

हरीशचंद्र शिवाजी लव्हाळे, रा. सताळा, ता. अहमदपूर जि. लातूर हा विनापरवाना देशी दारू विक्री करीत आहे.

**०३.** तद् नंतर मिळालेल्या बातमी आधारे, त्यांनी लागलीच दोन पंचांना घेउन बातमीचे ठिकाणी १८.३० वाजता छापा टाकला असता, त्याठिकाणी एक इसम देशी दारुची चोरटी विक्री करण्यासाठी बाळगलेला असताना दिसून आला. त्यानंतर त्यांनी मुद्देमालाची पंचासमक्ष पाहणी केली असता, त्यांना देशी दारु भिंगरी संतराच्या १८० मिलीच्या १२ बाटल्या रक्कम रुपये ९६०/– च्या मिळून आल्या. सदर बाटल्या त्यांनी पंचासमक्ष जप्त करुन ताब्यात घेतल्या. एक बॉटल सी.ए. तपासणीकरीता वेगळी केली. सबब, त्याप्रमाणे वर्दी दाखल करण्यात आली.

**<u>गुन्हा अन्वेषण</u> :–**

**०४.** वर्दीस अनुसरुन किनगाव पोलीस स्टेशन येथे आरोपीं विरुध्द महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम-१९४९, कलम–६५ (अ) व (ई) अनुसार गुन्हा क्रमांक २३४/२०२२ नोंदविण्यात आला. सदर गुन्हयाचे अन्वेषण पोना/१५४०, सुग्रीव सुदाम देवळे यांच्याकडे वर्ग केला. त्यांनी अन्वेषण कामी घटनास्थळाला भेट देउन घटनास्थळ पंचनामा तयार केला, जप्ती पंचनामा करुन मुद्देमाल जप्त केला, साक्षीदारांचे जबाब नोंदविले. तपासाअंती न्यायालयामध्ये फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १७३(२) अन्वये दोषारोपपत्र दाखल केले.

**<u>दोषारोप निश्चिती व आरोपीचा जबाब</u> :–**

**०५.** सदर प्रकरणात आरोपीं हजर झाल्यानंतर, मी आरोपींना फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कमल २०७ अन्वये दस्ताची पुर्तता केली. तद्नंतर, फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कमल २४० अन्वये **(निशाणी क्र.०५)** महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम-१९४९, कलम–६५ (अ) व (ई) गुन्ह्यासाठी दोषारोप निश्चीत केला. तद्नंतर, आरोपींना दोषारोपातील कथने त्याचे मातृभाषेत समजावले. आरोपींचे निवेदन अनुक्रमे **(निशाणी क्र.०६)** अन्वये गुन्हा नाकबुल करुन, प्रकरणाची संपरिक्षा करणेची याचना केली.

**०६.** आरोपींने स्वतःच्या बचावासाठी स्वतःस साक्षीदार म्हणुन तपासले नाही अगर इतर कोणताही पुरावा दाखल केला नाही. संपरीक्षे दरम्यान उभय पक्षांचा पुरावा संपुष्ठात आल्यानंतर, अभिलेखावर पुराव्याच्या अवलोकनांती, सबळ पुरावा आरोपींचे विरोधात निष्पन्न झाला नसल्यामुळे, फौजदारी प्रक्रिया संहिता कलम–३१३–१ (ब) अन्वये आरोपींचे निवेदन नोंदविले नाही.

**०७.** सहायक सरकारी अभियोक्ता यांनी अभिलेखानुसार युक्तीवाद केला. आरोपींच्या विद्वान विधिज्ञानी, आरोपीं विरूध्द काही पुरावा नसलेमुळे आरोपींची निर्दोष मुक्तता करणेबाबत याचना केली.

**०८.** अभिलेखावरुन पुढील मुद्दे विचारार्थ उपस्थित झाले. त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह पुढील प्रमाणे नोंदिवण्यात येत आहेत;

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने असे सिध्द केले काय की, दि.०८/१०/२०२२ रोजी १८.३० वाजताचे सुमारास आरोपीचे राहते घरी, सताळा, ता. अहमदपूर येथे, आरोपींनी अवैधरीत्या देशी दारुच्या १८० मि.ली. च्या १२ बाटल्या विना परवाना विक्री करण्याच्या उद्येशाने बाळगल्याचे स्थितीत आढळुन आला व त्यानुषंगाने आरोपींनी **महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम-१९४९, कलम–६५ (अ) व (ई) अन्वये गुन्हा केला आहे** ? | **...नकारार्थी** |
| २. | आदेश काय ? | **आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते.** |

## कारणमिमांसा

**०९.** सहायक सरकारी अभियोक्ता यांनी अभिलेखानुसार युक्तीवाद केला. आरोपींच्या विद्वान विधिज्ञांनी, आरोपीं विरूध्द काही पुरावा नसल्यामुळे आरोपीची निर्दोष मुक्तता करणेबाबत याचना केली.

**<u>मुद्दा क्र.१ करीता</u> :–**

**१०.** प्रस्तुत प्रकरणी अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार क्र.१ व २ हे घटनेतील घटनास्थळ व जप्ती पंच साक्षीदार आहेत. परंतु, सदर साक्षीदार हे अभियोग पक्षास सहकार्य करत नसल्यामुळे अभियोग पक्षाने, साक्षीदारांना भा.सा.पु. अधिनियम कलम १५४ अन्वये सुचक प्रश्न विचारले असता, साक्षीदारांनी अभियोग पक्षास सहाय्य करणारी कथने नाकारली.

**११.** उभयता पक्षकारांच्या पुराव्या अंती अभियोग पक्षावर असे दायीत्व आहे की, यातील आरोपींनी तथाकथित घटनेच्यावेळी अवैधरीत्या दारु बाळगून सदर दारु विक्री करण्याचा प्रयत्न केला.

**१२.** याठिकाणी अभियोग पक्षाने सर्वात प्रथम घटनेची वेळ, तारीख व घटनास्थळ हे सिध्द केले का, हे पाहणे गरजेचे आहे. अभियोग पक्षाच्या मते सदर घटना दि.०८/१०/२०२२ रोजी १८.३० वाजताचे सुमारास सताळा, आरोपीचे राहते घरी, सताळा, ता. अहमदपूर येथे घडली. सदर बाब सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने घटनास्थळ पंच साक्षीदार तपासले असता, सदर साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करीत नाहीत. शिवाय अभियोग पक्षाने घटनेतील प्रत्यक्षदर्शी साक्षीदार क्र.०१ व ०२ यांची साक्ष नोंदवुन सुध्दा घटनेबाबत कथने अभिलेखावर आली नाहीत. अभियोग पक्षाच्या वतीने अभिलेखावर आलेला पुरावा घटनेची वेळ, तारीख व घटनास्थळ सिध्द होण्या इतपत पुरावा आला नाही.

**१३.** तसेच दुसरा महत्वाचा घटक म्हणजे, आरोपीं हे तथाकथित घटनेच्यावेळी अवैधरीत्या दारु बाळगत होते काय ? सदर बाब सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने वैयक्तीक प्रत्यक्षदर्शी साक्षीदार क्र.१ व २ यांची साक्ष नोंदविली असता, सदर साक्षीदार हे अभियोग पक्षास सहकार्य करत नाहीत. अभियोग पक्षाच्या मते आरोपींच्या ताब्यातुन १२ बॉटल देशी दारु जप्त करण्यात आली. याठिकाणी अभियोग पक्षास जप्ती साक्षीदार सहाय्य

करत नाहीत, त्यामुळे तथाकथित जप्ती आरोपींच्या ताब्यातुन केली हे स्पष्ट होत नाही.

**१४.** तीसरा महत्वाचा घटक म्हणजे आरोपीं बाळगत असलेली दारु ही दारुच होती काय. सदर बाब सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने अभिलेखावर पृथ्थकरण चाचणी अहवाल सादर केला नाही. त्यामुळे जप्त मुद्येमाल हा दारु होती, हे सिध्द होत नाही.

**१५.** अभियोग पक्षाचा तोंडी व कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन करता, अभियोग पक्षाने अभिलेखावर सबळ, ठोस व विश्वसनीय पुरावा सादर करुन त्यांच्यावरील दायीत्व सिध्द केले नाही. त्यामुळे, मी या निष्कर्षाप्रत पोंहचलो आहे की, तथाकथित घटनेच्या वेळी आरोपींनी अवैधरीत्या दारु बाळगुन विक्री केली व महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे उल्लंघन केले, या बाबी अभियोग पक्षाने निःशंकपणे शाबीत केल्या नाहीत. त्यामुळे मी **वादप्रश्न क्र.०१ ची उत्तरे नकारार्थी** देत आहे.

**<u>वादप्रश्न क्र.०२ करीता</u>–**

**१६.** उपरोक्त विवेचनावरुन मी या तथ्यविषयक व विधीविषयक निष्कर्षास आलो आहे की, अभियोग पक्षाने आरोपीं विरुध्द असलेल्या महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम-१९४९, कलम ६५ (अ) व (ई) अन्वये आवश्यक असलेला गुन्हा सिध्द करण्यासाठी कोणताही पुरावा न्यायालयासमोर आणलेला नाही. तसेच सदर गुन्ह्यामध्ये वापरण्यात आलेल्या दारुबाबत योग्य आदेश पारीत करीत आहे. सबब, आरोपीं हे निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. म्हणून मी **वादप्रश्न क्र.०२ चे निष्कर्षार्थ खालीलप्रमाणे आदेश**

**पारीत करीत आहेः–**

## आदेश

१) आरोपींची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम–२५५(१) अन्वये, महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम-१९४९, कलम ६५ (अ) व (ई) अंतर्गत शिक्षापात्र दोषारोपातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२) आरोपींचे बंधपत्र व जामीन पुढे कायम करण्यात येते.

३) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम-१९४९, कलम ९८ नुसार अपील कालावधी संपल्यानंतर निशाणी क्र.०३ वरील जप्त मुद्येमाल म्हणजेच देशी दारु भिंगरी संतराच्या १८० मिलीच्या 12 बाटल्या ह्या नाशवंत असल्यामुळे राज्य उत्पादन शुल्क कार्यालय, लातूर यांच्याकडे पुढील विल्हेवाटीकरीता पाठविण्यात याव्यात.

४) फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ च्या अनुपालनाकरीता, आरोपींनी पुर्वी दाखल केलेली प्रत्येकी रक्कम रू.१५,०००/– चा जामिन कदबा, अपिल कालावधी संपुष्टात येईपर्यंत कायम केला.

(न्यायनिर्णय खुले न्यायालयात अधिघोषित असे)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by SHYAM SHIVAJI TONDACHIRE
Date: 2024.01.04 11:15:47 +0530

**स्थळः–** अहमदपूर ( **श्याम एस. तोंडचिरे** )

**दिनांक :–** ०२/०१/२०२४. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, ( न्या. क्र. ०३)

अहमदपूर.

न्या. दं. प्र. वर्ग